# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** विसरवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0395 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**29/09/2026 17:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिंनाक पासून):** 29/09/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 29/09/2026
**Time From (वेळेपासून):** 11:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 29/09/2026 **Time (वेळ):** 12:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 010
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 29/09/2026 17:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 18 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** खांडबारा ते मेहदीपाडा फाट्यावर, खांडबारा ते मेहदीपाडा फाट्यावर,नवापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रशांत चिमणराव भरते

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,नंदुरबार,नंदुरबार,विसरवाडी,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,नंदुरबार,नंदुरबार,विसरवाडी,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8888892478

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेद्र भामटया वसावे | | | 1. जनता पार्क गल्ली नं 3 नवापुर , नवापुर ,विसरवाडी,नंदुरबार, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | त्यात 500/ रुपये दराच्या 04 | 2,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

विसरवाडी पो.स्टे.,

दि.29/09/2026

मी, प्रशांत चिमणराव भरते, वय 48 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नंदुरबार. मो.नं. 8888892478
सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नंदुरबार येथे मागील दिड वर्षापासुन पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिंनाक 27/09/2026 रोजी तक्रारदार आनंद रणजीत वसावे रा. मोठे कडवाण ता. नवापुर जिल्हा नंदुरबार यांनी असई/विलास पाटील नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना संपर्क करुन एक लोकसेवका विरुध्द तक्रार असल्या बाबत माहिती कळवुन वडदा ता.नवापुर येथे दि. 28/09/2026 रोजी येवुन कारवाई करण्याबाबत विंनती केली. त्याप्रमाणे आम्ही मुख्य अधिकारी, नगर परीषद शहादा व तहसीलदार , तहसील कार्यालय शहादा यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही दिंनाक 28/09/2026 रोजी नंदुरबार येथुन सापळा कारवाई साठी लागणारे सर्व साहित्यानिशा शासकीय वाहनाने, दोन पंच व स्टाफ असे वडदा ता. नवापुर येथील हनुमान मंदीराचे जवळील मोकळया जागेत आलो सदर ठिकाणी तक्रारदार आनंद रणजीत वसावे हे हजर होते. त्यानंतर सदर ठिकाणी दोन पंच, व सापळा पथकातील अंमलदार असई/ विलास पाटील व पोहवा/संदीप खंडारे, पोना/ हेमंतकुमार महाले यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव आनंद रणजीत वसावे, वय 36 वर्षे, व्यवसाय- शेती, मुळ रा. मोठे कडवाण ता.नवापुर जिल्हा नंदरबार जिल्हा नंदुरबार असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार आनंद वसावे यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की," समक्ष हजर होऊन तक्रार लिहुन देतो की, मी वर नमुद पत्यावर माझी पत्नी सुगीता , आई मालती, वडील रणजीत महारु वसावे अशासह राहतो. शेती करुन उदर निवाह करतो. आमचे मोठे कडवाण गावाचे शिवारात गट नं 12/2/अ मध्ये 8 एकर शेती आहे. सदर शेती आमची वडीलोपार्जीत असुन माझे वडील रणजीत महारु वसावे हे खातेदार आहेत.

आमचे वरील नमुद शेतात बोअरवेल करण्यात आला आहे. परंतु सदर बोअर वेलला मोटार पंप आवश्यक असल्याने, आम्ही माझे वडील रणजीत महारु वसावे यांच्या नावाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे कडील " मागेल त्याला सौर कृशी पंप " या योजनेतंर्गत दिनाक 02/05/2026 रोजी आमचे शेतात सौर कृशीपंप मिळणे कामी ऑनलाईन अर्ज केला असुन त्याकामी शासकीय फि 21,500/-रुपये ऑनलाईन भरले होते. त्यानंतर दिंनाक 24/09/2026 रोजी वायरमन श्री. राजेंद्र वसावे हे आमचे शेतात आले त्यांनी माझे वडील रणजीत वसावे व बोअरवेलचा फोटो काढला होता. व तेव्हा त्यांनी माझ्याकडे " मी तुमच्या शेताचा फोटो आमच्या कार्यालयाच्या वेबसाईट वर अपलोड करेल, तेव्हाच तुम्हाला सौर कृशीपंप मिळेल" असे सांगुन सदर फोटो अपलोड करण्यासाठी माझ्याकडुन 2500/-रुपये मागणी केली व जो पर्यत तुम्ही पैसे देणार नाही मी हा फोटो अपलोड करणार नाही असे

बोलुन गेले होते.

परंतु वायरमन श्री. राजेंद्र वसावे ह माझ्याकडे मागत असलेले 2,500/-रुपये ही कोणतीही फी नसुन ती लाचच आहे याबाबत माझी खात्री झाल्याने व मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील माझे ओळखीचे श्री. विलास पाटील यांना संपर्क केला व दि. 28/09/2026 रोजी वडदा हनुमान मंदीर जवळ येथे तक्रार दिली आहे"

उपरोक्त प्रमाणे तक्रारीचे अनुषंगाने सदर दिवषीच लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार आनंद वसावे व पंच क्र. 1, श्री. महेंद्र ईशी यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोहवा/संदीप खंडारे यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार आनंद वसावे यांचे शर्टचे आत बनियनला बांधुन तक्रारदार यांचेकडील खाजगी दुचाकी वाहनाने 13.30 वाजेच्या सुमारास खांडबारा सब स्टेशन येथे लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांची भेट घेणे कामी नवापुर खांडबारा रोडवरील कोकणी हॉस्पीटल जवळील रोडवरुन रवाना केले होते. थोडयावेळाने तक्रारदार आनंद वसावे व पंच क्र. 1, श्री. महेंद्र ईशी हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोहवा/संदीप खंडारे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र. 1 व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी लोकसवेक वायरमन राजेंद्र वसावे यांनी त्यांना वाटवी गावाजवळ रोडवर भेटण्यासाठी बोलविले असल्याचे सांगितल्याने, आम्ही स्टाफसह खांडबारा ते वाटवी रोडवर एका मोठया वडाचे झाडाजवळ थांबुन तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कामी तक्रारदार आनंद वसावे व पंच क्र. 1, श्री. महेंद्र ईशी यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोहवा/संदीप खंडारे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार आनंद वसावे यांचे शर्टचे आत बनियनला बांधुन तक्रारदार यांचेकडील खाजगी दुचाकी वाहनाने 13.54 वाजेच्या सुमारास वाटवी गावाजवळ लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांची भेट घेणे कामी रवाना केले होते.

थोडयावेळाने तक्रारदार आनंद वसावे व पंच क्र. 1, श्री. महेंद्र ईशी हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोहवा/संदीप खंडारे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र. 1 व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता, पंच क्र. 1 व तक्रारदार यांनी हकिकत सांगितली की, तक्रारदार व लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांची भेट झाली त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणा मध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार आनंद वसावे यांना पंचवीशे लागेल मला वरती पण दयावे लागेल असे सांगुन तडजोडअंती तक्रारदार यांनी दोन हजार देईल असे सांगितले होते." यावरुन लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांनी तक्रारदार आनंद वसावे यांना यांचेकडुन 2,000/- रुपयाची स्पष्ट स्वरुपात लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली. यावरुन लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांनी तक्रारदार यांचे वडील रणजीत महारु वसावे यांच्या नावाने महाराश्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे कडील " मागेल त्याला सौर कृशी पंप " या योजनेतंर्गत शेतात येवुन अर्जदार रणजीत वसावे व शेतातील बोअरवेलचा फोटो काढुन महावितरण कार्यालयाच्या वेबसाईटवर सदर फोटो अपलोड करण्यासाठी तक्रारदार यांचेकडुन प्रथम 2500/- रुपये व तडजोडअंती 2000/-रुपये मागणी केले बाबत खात्री झाली होती. तसा लाच मागणीबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनाक 29/09/2026 रोजी आम्ही तक्रारदार आनंद वसावे यांना लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांना त्यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम 2,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांनी त्यांचे शेती व मजुरीचे बचत केलेले 2,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 04 चलनी नोटा हजर केल्या आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. 2, कृपेश गावीत यांनी सदर नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पोहवा/नरेंद्र पाटील यांनी सदर लाचेच्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या मागिल डावे बाजुच्या खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार आनंद वसावे यांनी पंचासमक्ष फोनवर संपर्क करुन लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांना भेटी बाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार यांना खांडबारा चौफुली येथे बोलाविले त्याप्रमाणे तक्रारदार आनंद वसावे यांना पंच क्र. 1 श्री. महेंद्र ईशी यांचेसह लाचेची रक्कम घेवुन खांडबारा येथील चौफुली जवळ लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे यांची भेट घेणे कामी पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी आमचे सुचनेवरुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरु करुन तक्रारदार

आनंद वसावे यांचे टिंशटाचे आत बनियनला लावुन देवुन त्यांना पंच नं 1 यांच्या सोबत तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने 11.55 वाजेच्या सुमारास रवाना केले व आम्ही तसेच सापळा पथकातील सदस्य असे आमच्या जवळील खाजगी वाहनाने त्यांच्या मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार आनंद वसावे व पंच क्र. 1 महेंद्र ईशी असे खांडबारा येथील चौफुली जवळ पोहचलो. त्यानंतर आम्ही नमुद चौफुलीच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार हे त्यांच्या दुचाकी वाहनाने खांडबारा ते मेहंदीपाडा रस्त्याकडे जाऊ लागल्याने आम्ही सापळा पथक खाजगी वाहनाने तक्रारदार यांच्या मागे जावु लागलो थोडया अंतरावर तक्रारदार आनंद वसावे हे थांबले व मेहंदीपाडा गावाकडुन येणा-या एका इसमा सोबत तक्रारदार भेटले व चर्चा झाले नंतर तक्रारदार यांना आधी ठरवुन दिलेल्या ईशा-या प्रमाणे लाच रक्कम स्विकारल्या नंतर 11.48 वाजेच्या सुमारास सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक राजेंद्र वसावे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोहवा/विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या लोकसेवक वायरमन राजेंद्र वसावे त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव राजेंद्र भामटया वसावे वय 40 वर्षे व्यवसाय नोकरी वरीष्ठ तंत्रज्ञ नेमणुक महावितरण सब स्टेशन खांडबारा रा. बंधारे ता.नवापुर जि.नंदुरबार , ह.मु जनता पार्क गल्ली नं 3 नवापुर जि.नंदुरबार असे सांगितले.

तरी दिंनाक 28/09/2026 रोजी लोकसेवक राजेंद्र भामटया वसावे वय 40 वर्षे व्यवसाय नोकरी वरीष्ठ तंत्रज्ञ नेमणुक महावितरण सब स्टेशन खांडबारा रा. बंधारे ता.नवापुर जि.नंदुरबार , ह.मु जनता पार्क गल्ली नं 3 नवापुर जि.नंदुरबार यांनी तक्रारदार श्री. आनंद रणजीत वसावे यांचे यांचे वडील रणजीत महारु वसावे यांच्या नावाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे कडील " मागेल त्याला सौर कृषी पंप " या योजनेतंर्गत शेतात येवुन अर्जदार रणजीत वसावे व शेतातील बोअरवेलचा फोटो काढुन महावितरण कार्यालयाच्या वेबसाईटवर सदर फोटो अपलोड करण्यासाठी तक्रारदार यांचेकडुन प्रथम 2500/-रुपये व तडजोडअंती 2000/-रुपये मागणी करुन आज दिंनाक 29/09/2026 रोजी 11.48 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 यांचेसमक्ष खांडबारा ते मेहंदीपाडा गावाचे फाटयाजवळ लाचेची रक्कम 2,000/-रुपये स्विकारली, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे फिंयाद आहे.

माझी वरील फिंयाद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष,

हि फिंयाद दिली.
दि.29/09/2026.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Jayesh Dagdu Khalane(I (Inspector)) / DGPJDKM8801 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Jayesh Dagdu Khala
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPJDKM8801

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):